# ०७ -राशिवरून व्यक्तीमत्वाचा अंदाज

आपल्या सर्वांना माहीत आहे कि १२ चंद्रराशी आहेत. चंद्र म्हणजे जन्मवेळी ज्या राशीत चंद्र असेल ती रास. १२ राशी व त्यांचे नंबर खालीलप्रमाणे.

१ मेष २ वृषभ ३ मिथुन ४ कर्क ५ सिंह ६ कन्या ७ तुळ ८ वृश्चिक ९ धनु १० मकर ११ कुंभ १२ मीन

चंद्र ज्या स्थानात पत्रिकेत असेल त्या स्थानातील आकडा म्हणजे आपली रास. प्रत्येक राशीची स्वभाववैशिष्ट्ये दर्शविणारा तक्ता दिला आहे त्याचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

वेगवेगळया वैशिष्टयांची आपण प्रथम ओळख करून घेऊ या.

अधिपती / राशीस्वामी ः प्रत्येक ग्रहाचे सुद्धा वैशिष्ठ आहे. त्यासंदर्भात वेगळा तक्ता दिला आहे. जेव्हा राशीची वैशिष्टये व ग्रहाची वैशिष्टये जुळतात त्यावेळी जोरदार फळ मिळू शकते.
उदा. मेष राशीचा स्वामी मंगळ. मेष रास व मंगळ ग्रह हे पुरूष आहेत त्यामुळे मिळणारी फळे ही वृश्चिकराशीला मिळणार नाहीत. कारण वृश्चिकरास स्त्री रास व अधिपती मंगळ हा पुरूष ग्रह आहे.

स्वभाव ः तीन प्रकारचे स्वभाव असतात. चर , स्थिर , दिस्वभाव.
चर म्हणजे सतत बदल , चंचल.
स्थिर म्हणजे एकदा विचार केला की बदल नाही.
द्विस्वभाव म्हणजे निर्णयक्षमता कमी. कोणता निर्णय घ्यावा अशा द्विधामनःस्थितीत.

उदा. सिंह राशीचा स्वभाव स्थिर आहे. विचारात बदल होत नाही. लोक ह्या स्वभावाला ‘ हट्टी ’ म्हणतात.

अवयव ः राशीच्या अंमलाखालील अवयव दर्शविलेले आहेत. ह्या अवयवांच्या बाबतीत जातकाने सर्वधारणपणे खबरदारी घेणे आवश्यक आहे.

प्रसव ः वंध्या राशी , जुळया , बहुप्रसव.
अर्थात ह्याचे निष्कर्ष शिरोधार्थ मानायचे कारण नाही. उदा.कर्क रास बहुप्रसव आहे. याचा अर्थ भरपूर मुले होतील असा न होता मूल लवकर होऊ शकेल असा अर्थ घेणे जास्त संयुक्तीक आहे.
जुळया म्हणजे जुळीच मुले जन्माला येतील असे नाही. आपण फारच कमी जुळी मुले बघतो त्यावरूनच हे सिद्ध होते.
वंध्या म्हणजे मुल न होणे. याचा अर्थ मूल होण्यास विलंब लागेल किंवा एखाद दुसरेच मुल होईल.तसेतर सुशिक्षित समाजात एकच मुल असते.

लिंग ः पुरूष , स्त्री
समानतेच्या युगात सुद्धा पुरूष व स्त्री यामध्ये काही मुलभूत फरक असतात. पुरूष धाडसी असतो , अविवेकी असण्याची शक्यता असते , शक्ती जास्त असते वगैरे.
स्त्री जास्त सोशिक असते. प्रेमळ असते वगैरे अर्थात प्रत्येक वेळीच ह्या प्रमाणे परिस्थिती असेल असे नाही.
विषम रास ही पुरूष रास असते. सम रास ही स्त्री रास असते.

नक्षत्र ः प्रत्येक राशिच्या अधिपत्याखालील नक्षत्रे असतात. नक्षत्रांचा वेगळया तक्ता दिला आहे. प्रत्येक नक्षत्राची वैशिष्टये जर राशिच्या वैशिष्यांबरोबर जुळत असतील तर जातकाला चांगले फळ मिळेल.

उदा. मेष रास - पुरूष रास. अधिपती मंगळ – पुरूष ग्रह. नक्षत्र अश्विनी – पुरूष नक्षत्र.

त्याचबरोबर नक्षत्र स्वामी आणि राशीस्वामी मित्र असतील तर चांगला परिणाम घडून येऊ शकतो.
समजा मेषरास व कृत्तिका नक्षत्र असेल तर राशी अधिपती ' मंगळ ' व नक्षत्र स्वामी ' रवि ' हे मित्र आहेत त्यामुळे मिळणारे फळ जोरकरपणे मिळेल.

घातचक्र ः प्रत्येक राशीला कोणता मराठी महिना , तिथी , वार व नक्षत्रे लाभत नाही हे कळू शकते. एखादे मोठे काम / किंवा निर्णय ह्या योगावर घेऊ नये. लांबचा प्रवास ह्या योगावर सुरू करू नये. परंतु आपल्या रोजच्या कर्मासाठी हे घातचक्र विचारात घेऊ नये.

गण ः
देवगण ः सत्प्रवृत्ति , सदाचार , परोपकार , धर्मानुसार आचरण व परमेश्र्वर निष्ठा हे सद्‌गुण आहेत.
मनुष्यगण ः जगातील सुखोपोभोग भोगावे पण त्याला धार्मिक बंधनेही असावीत , स्वार्थासाठी देवाची यथाशक्ती आराधना करावी असे मनुष्यगण सुचवितो.
राक्षस गण ः तुझे ते माझे व माझे ते माझ्या बापाचे ही आसुरी प्रवृत्ति व राक्षसी महत्वाकांक्षा.

वर्ण ः
क्षत्रियः मदत न घेणारे.
वैश्यः **Happy go lucky.**
शूद्रः वाटेल ते /पडेल ते काम करायची तयारी.
विप्रः **Ambition, take efforts to achieve.**

योनि ः योनीला जलचरांची नावे दिली आहेत. गो – व्याघ्र , महिषी – अश्र्व , श्र्वान – मृग , मार्जार – मुषक , सिंह – गज , वानर – मेष , नकुल – सर्प ह्या परस्पर योनी आहेत. नवरा – बायकोची अशी योनि असल्यास वैवाहिक सुरवात अडचणी येतात.

नाडी ः एकूण ३ नाडया आहेत. नक्षत्राची नाडी तुम्हाला तक्त्यावरून कळेल.
आद्यनाडी असेल तर कफ प्रवृत्ति असते. मध्य नाडी असेल तर पित्त दोष असतो. अंत्यनाडी असेल तर वातप्रकृत्ति असते. ह्यावरून जातकाला कोणत्या प्रकारचे त्रास संभवतात हे कळून येते.
राशिस्वामीवरूनसुद्धा पित्त – कफ – वात प्रकृतिचा अंदाज येतो.

स्वगृहरास ः प्रत्येक ग्रहाचे स्वतःचे घर असते. तो ग्रह जर स्वतःच्या घरात असेल तर चांगले फळ देतो.
उच्चरास ः प्रत्येक ग्रह आपल्या उच्च राशीतही चांगले फळ देतो.
नीचरास ः ( उच्चराशीपासून ७ वी रास ) ह्या राशीत ग्रह चांगली फळे देण्यास असमर्थ असतो.
निर्बलरास ः ( स्वगृहराशीपासून सातवी रास ) ह्या राशीत ग्रह फळे देण्यास असमर्थ असतो. ग्रहाचा प्रभाव पडत नाही.

आता आपल्याला रास कळल्यानंतर व्यक्तीमत्वाचा अंदाज कसा घेता येईल हे उदाहरणावरून बघूया.

मेष राशीचे काही गुणधर्म बघू या.
अधिपती – मंगळ , गुण – रजो , चिन्ह – मेंढा , स्वभाव – चर , लिंग – पुरूष , वर्ण – क्षत्रिय
मेष रास ही पुरूष रास आहे , चिन्ह मेंढा. म्हणजे ही व्यक्ती आक्रमक असण्याची शक्यता आहे. कारण कारक ग्रह मंगळ व वर्ण क्षत्रिय. त्यामुळेच ही व्यक्ती स्वभावाने बेघडक , स्पष्टव्यक्ती , सळसळत्या व्यक्तीमत्वाची असेल.

परंतु हे गुण पुरूषात असतील तर फार काही आक्षेपार्ह वाटणार नाही. पण एखाद्या स्त्रीची मेष रास असेल तर ह्या गुणांमुळे पंचाईतच होईल. व्यक्ती स्त्री व रास पुरूष म्हणजे ब-याच अंशी अशा स्त्रीची कुंचबणा होऊ शकते कारण तीच्या जन्मजात

गुणांना केवळ ती स्त्री असल्यामुळे वाव मिळणार नाही. परंतु अशा स्त्रीला मर्दानी क्षेत्रात ( पोलीस ,आर्मी ) जायला पाठींबा व संधी मिळाली तर ह्या गुणांचे सोने होईल. अशी स्त्री जरी ऑफीसात असली तरी आपल्या हाताखालील सेवकवर्गाला जरबेत ठेवेल.

अशीच थोडीफार अवस्था जर स्त्रीची रास सिंह , वृश्चिक असेल तर होऊ शकेल.

रास , ग्रह व नक्षत्र ह्याचा वरील विवेचनानुसार अभ्यास करावा. एका कागदावर आपली रास , तिची वैशिष्टये ,
राशीस्वामी , जन्मनक्षत्र व वैशिष्टये वगैरेची जंत्री करावी. कोणत्या गोष्टी / वैशिष्टये एकमेकाला पुरूक आहेत , विरूद्ध आहेत याचा अभ्यास करावा व आपल्या व्यक्तीमत्वाचा अंदाज घ्यावा.

असाच अभ्यास आपल्या कुटूंबातील व्यक्तीचा करावा. मला खात्री आहे कि अशा अभ्यासावरून आपल्या जवळील व्यक्ती कशा वागतात , बोलतात , त्यांचे विचार वगैरेची बरीच कोडी सुटायला मदत होईल.

राशि , जन्मनक्षत्र व राशिअधिपती यांचा तक्ता दिला आहे. ह्या तक्त्यात स्वतःची माहिती भरावी व वरील विवेचनानुसार व्यक्तीमत्वाचा अंदाज करावा.